1 5 MAR 2026

जनप्रवास

जनसपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# राष्ट्रीय युवा महोत्सवात शिवाजी विद्यापीठ संघाचे यश



असोसिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटीज, नवी दिल्ली आयोजित सत्यभामा विद्यापीठ चेन्नई येथे १० ते १४ फेब्रुवारी या कालावधीत झालेल्या राष्ट्रीय युवा महोत्सवात उज्ज्वल यश प्राप्त करणारा शिवाजी विद्यापीठाचा संघ.

**जनप्रवास : कोल्हापूर**

असोसिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटीज, नवी दिल्ली आयोजित सत्यभामा विद्यापीठ चेन्नई येथे १० ते १४ फेब्रुवारी या कालावधीत झालेल्या राष्ट्रीय युवा महोत्सवात शिवाजी विद्यापीठाचा एकुण २९ सदस्यांचा संघ सहभागी होऊन उज्ज्वल यश प्राप्त केले आहे. यात मातीकाम – प्रथम, रांगोळी – प्रथम, वक्तृत्व (हिंदी) – प्रथम, सांस्कृतिक शोभायात्रा – द्वितीय, पाश्चिमात्य एकल गायन – द्वितीय, पाश्चिमात्य समूह गायन – द्वितीय, सुगम गायन – द्वितीय, शास्त्रीय तालवाद्य – तृतीय आणि व्यंगचित्र – पंचम. तर ललितकला विभागाचे सर्वसाधारण विजेतेपद विद्यापीठास प्राप्त झाले आहे.

या राष्ट्रीय युवा महोत्सव विद्यापीठ संघास प्रा. डॉ. सुरेश गोसावी, प्रा. डॉ. श्रीमती ज्योती जाधव, डॉ. व्ही. एन. शिंदे, कुलसचिव, डॉ. टी. एम. चौगले, संचालक, विद्यार्थी विकास विभाग, श्रीमती एस. टी. आडके, अधीक्षक यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. सदर संघाचे तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून बबन माने, संग्राम भालकर, प्रा. प्रमोद पाटील, ऋषिकेश देशमाने, नितीन शिंदे, गणेश इंडीकर, सुमंत कुलकर्णी व चैतन्य देशपांडे यांनी काम पाहिले.

सदर संघासोबत संघव्यवस्थापक म्हणून डॉ. प्रमोद कसबे, स्कूल ऑफ नॅनोसायन्स अ‍ॅन्ड टेक्नॉलॉजी, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर व महिला संघव्यवस्थापक म्हणून डॉ. संजीवनी पाटील, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गडहिंग्लज, वरिष्ठ सहायक विजय इंगवले व सर्व तज्ज्ञ मार्गदर्शक उपस्थित होते.

...विद्यापीठ, कोल्हापूर
15 MAR 2026

लोकमत

# 'जनरेशन झेड'मध्ये मानसिक स्थैर्य वाढविण्याची गरज

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : 'जनरेशन झेड' अध्ययनार्थीमध्ये बुद्धिगुणांक, भावनिक बुद्धिमत्तेबरोबरच मानसिक स्थैर्याकडे संक्रमण करण्याची गरज असल्याचे प्रतिपादन आंतरविद्याशाखेचे अधिष्ठाता प्रा. अजय साळी यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या शिक्षण विभागातर्फे 'नावीन्यपूर्ण अध्यापनशास्त्र' या विषयावरील कार्यशाळेत 'जनरेशन झेड'वर ते बोलत होते. विभागप्रमुख डॉ. चेतना सोनकांबळे यांनी विद्यापीठीय शिक्षणाचे व सर्वांगीण विकासाचे महत्त्व सांगितले. समन्वयक डॉ. विद्यानंद खंडागळे यांनी कार्यशाळेचा हेतू स्पष्ट केला. कार्यशाळेसाठी सांगली, गारगोटी, गडहिंग्लज आणि कोल्हापूर शहरातील अध्यापक महाविद्यालयातील शिक्षक प्रतिनिधी तसेच विद्यार्थी सहभागी झाले होते.

सतीश कुंभार यांनी अनुभवाद्वारे विविध अध्यापनांसाठी वापरल्या जाणाऱ्या प्रतिकृती तयार करण्याचे प्रशिक्षण विद्यार्थ्यांना दिले. डॉ. सुप्रिया पाटील यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी डॉ. रूपाली संकपाळ, सरस्वती कांबळे, सारिका पाटील उपस्थित होत्या.

